महाराष्ट्र शासन
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई यांचे कार्यालय.

विषय:- एफएल.१ अनुज्ञप्ती खाली परदेशातून आयात झालेले दत्तशुल्क विदेशी मद्य परिवहन करताना पथरक्षणाची आवश्यकता नसल्याबाबत.

.............

# परिपत्रक

क्रमांक. एफएलआर. ११२००६/पथरक्षण/साल.

मुंबई, १६ ऑगस्ट, २००६.

महाराष्ट्र विदेशी मद्य (आयात व निर्यात) नियम, १९६३ चे नियम ४ ते ९ या खाली परदेशातून आयात केलेल्या दत्तशुल्क (Duty paid) विदेशी मद्याच्या आयात व परिवहन बाबतची कार्यपध्दती निर्धारित केलेली आहे. सदर नियमातील तरतूदींप्रमाणे इंडियन टॅरिफ ॲक्ट किंवा कस्टम्स ॲक्ट खाली लागू असलेले सर्व शुल्क देऊन कस्टम विभागाच्या बंदिस्त वखारीतून एफएल.१ अनुज्ञप्तीकडे अशा विदेशी मद्याचे परिवहन करण्यासाठी मुंबई विदेशी मद्य व रेक्टीफाईड स्पिरीट (परिवहन) फी बाबतचे नियम, १९५४ खाली निर्धारित आगाऊ फी वसूल करुन जिल्हाधिकारी यांनी निर्धारित केलेल्या अधिकाऱ्यामार्फत परिवहन पास दिला जातो व त्या आधारे अशा मद्याचे परिवहन केले जाते. अशा दत्त शुल्क विदेशी मद्याच्या परिवहनाकरिता पथरक्षणासाठी संबंधीत नियमात कोणतीही तरतूद केली असल्याचे दिसून येत नाही. परंतू मुंबई दारुबंदी कायदा, १९४९ चे कलम १४४ खाली आयुक्तांना असलेलया अधिकारान्वये आयुक्तांनी अशा मद्याच्या परिवहनाकरिता पथरक्षणाची तरतूद यापूर्वी केलेली असावी व त्यानुसार अशा वाहतूकीस आजतागायत पथरक्षण दिले जात आहे. परंतू आयुक्तांच्या असे निदर्शनास आले आहे की, अशा रितीने आयात केलेल्या मद्याचे बाबतीत केंद्रशासनाचे व राज्य शासनाचे अनुक्रमे शुल्क व फी परिवहनापूर्वीच वसूल झालेली असल्यामुळे व तसेच एफएल.१ अनुज्ञप्तीधारकाकडे उत्पादन शुल्क विभागाचा अधिकारी कार्यरत असल्यामुळे या दत्त शुल्क मद्याचे परिवहन करताना पथरक्षण देऊन कोणताही हेतू साध्य होत नाही. शिवाय विभागात जवानांची कमतरता असल्यामुळे असे पथरक्षण उपलब्ध करुन देण्यास उशिर होतो व त्यामुळे अनुज्ञप्तीधारकाच्या दैनंदिन व्यवहारात अडचणी निर्माण होतात. तरी याद्वारे असे आदेश देण्यात येत आहे की, यापुढे कस्टम्स विभागाच्या बंदीस्त वखारीतून परदेशातून आयात केलेले विदेशी मद्य एफएल.१ अनुज्ञप्तीपर्यंत परिवहन करताना पथरक्षण

देण्याची आवश्यकता नाही. मात्र अशा आयातीस व परिवहनास फी बाबत तसेच परिवहन पास बाबतच्या सर्व तरतूदी आहेत त्याप्रमाणे लागू राहतील व त्यात कोणताही बदल राहणार नाही. सर्व अधीक्षकांनी तसेच प्रभारी अधिकाऱ्यांनी याबाबतची नोंद घ्यावी.

आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

१) सर्व जिल्हाधिकारी यांना सस्नेह.

२) सर्व विभागीय उपआयुक्त, राज्य उत्पादन शुल्क.

३) या कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकारी.

४) सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क.

५) या कार्यालयातील सर्व कार्यालय अधीक्षक.

६) अभिलेख शाखा ५ प्रती.

७) मा. आयुक्तांचे स्वीय सचिव दोन प्रती.

Svk/Circular